# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १७ // विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक १७/०९/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१७/०९/२०१९ मंगळवार रोजी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती मा.श्री.मराठे जितेंद्र भगवान यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा.श्री.मराठे जितेंद्र भगवान सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | सनकत चेतन गणेश |
| बेंडाळे उज्ज्वला मोहन | सोनवणे सुरेश माणिक |
| कोल्हे प्रविण रामदास | कापसे मयुर चंद्रकांत |
| खडके सुनिल वामनराव | बरडे नितीन मनोहर |
| पाटील प्रतिभा सुधिर | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

सदर सभेस मा.उपायुक्त श्री.अजित मुठे, श्री.उत्कर्ष गुटे, श्री.मिनानाथ दंडवते तसेच नगरसचिव,श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**मा.सभापती :-** सभेस गणपूर्ती असलेने नगरसचिव यांनी सभेचे कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचा रजेचा अर्ज आलेला असून तो मा.सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीनुसार स्थायी समितीमधुन आठ (निम्मे) सदस्य निवृत्त करणेबाबत.

**नगरसचिव :-** जळगांव शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक २०१८ संपन्न झालेनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(२) चे तरुतुदीनुसार स्थायी समिती गठन करणेसाठी कलम ३१ अ (१) व (२) चे तरतूदीनुसार पक्षीय बलाबल लक्षात घेवून महासभा ठराव क्र.०१ दि.११/१०/२०१८ अन्वये स्थायी समितीत सोळा (१६) सदस्य नामनिर्देशनाव्दारे नियुक्त करुन समितीचे गठन करण्यांत आले होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरुतुदीनुसार स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील, अशी तरतूद आहे.

त्याचप्रमाणे कलम २० (४) चे तरतूदीनुसार पोट-कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोटकलम (३) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारेखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरवील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील. सदर तरतूदीच्या अनुषंगाने स्थायी समितीच्या सोळा सदस्यांमधून आठ सदस्य निवृत्त करणेकामी आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

**मा.सभापती :-** सदस्य निवृत्त करण्याची पध्दत कशी राहिल हे नगरसचिव यांनी सभागृहात स्पष्ट करावे.

**नगरसचिव :-** स्थायी समितीत आज कार्यरत असलेल्या सोळा सदस्यांच्या नावाच्या सारख्या आकाराच्या व एकाच रंगाच्या चिठ्ठया तयार करण्यात आलेल्या आहेत. एकाच रंगाच्या चिठ्ठयांची गुंडाळी करुन त्यांना एकाच कलरचे रबर बॅण्ड लावुन ती सर्व एक-एक मोजून एका प्लॅस्टीकच्या पारदर्शक ड्रममध्ये टाकण्यात येतील. तद्नंतर ड्रम गोलाकार फिरवून सरमिसळ करण्यात येतील. त्यानंतर सभासद ठरवतील त्या व्यक्तीकडून एक-एक चिठ्ठी या प्रमाणे आठ चिठ्ठया बाहेर काढण्यात येतील. याप्रकारे आठ चिठ्ठया बाहेर काढलेनंतर ड्रममध्ये सुध्दा आठच चिठ्ठया शिल्लक राहतील. त्यामुळे ज्यांच्या नावाची चिठ्ठी बाहेर निघतील ते सदस्य निवृत्त होतील किंवा ज्यांच्या नावाची चिठ्ठी ड्रममध्ये राहतील ते सदस्य निवृत्त होतील याबाबत अधिनियमाच्या कलम २० (४) चे तरतूदीनुसार मा.सभापती यांनी प्रक्रिया सुरु करणेपुर्वी निर्णय देणे आवश्यक आहे. याप्रमाणे सदस्य निवृत्त करण्याची प्रक्रिया राहील. आता सदस्यांच्या नावाच्या तयार करण्यात आलेल्या चिठ्ठया वाचून दाखविण्यात येत आहेत. ज्यांना चिठ्ठया प्रत्यक्ष निरीक्षण करावयाच्या असतील ते पाहू शकतात. तद्नंतर नगरसचिव यांनी प्रत्येक चिठ्ठी वरील नांवे वाचून दाखविलीत.

(नगरसचिव यांनी सन्मा.सदस्यांची नांवे लिहिण्यात आलेल्या चिठ्ठया वाचून सन्मा.सदस्यांना दाखविल्या.)

**नगरसचिव :-** सभागृह ठरविल त्याप्रमाणे चिठ्ठया काढण्यात येतील. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

(चर्चेअंती सभागृहाने असे ठरविले की, शाळेतील लहान मुलांनी एक-एक चिठ्ठी या प्रमाणे आठ चिठ्ठया काढाव्यात.)

**नगरसचिव :-** मा.सभापती यांनी काढणेत आलेल्या चिठ्ठयामधील नांवे असणारे सदस्य निवृत्त होतील किंवा न काढलेल्या चिठ्ठयामधील सदस्य निवृत्त होतील याबाबत प्रथमत: निर्णय दयावा.

**मा.सभापती :-** मनपा शाळेतील लहान मुलांच्या हातुन एक-एक चिठ्ठी अश्या आठ चिठ्ठया काढाव्यात. ज्या चिठ्ठया बाहेर काढणेत येतील त्या चिठ्ठयावरील नांवे असलेले सन्मा.सदस्य निवृत्त होतील व ज्या चिठ्ठया ड्रममध्ये राहतील त्या चिठ्ठयावरील नांवे असलेले सदस्य स्थायी समितीमध्ये कायम राहतील.

मा.सभापती यांचे उक्त निर्णयानुसार सभागृहात एक पारदर्शक प्लॅस्टीकचा ड्रम मागविण्यांत आला. ड्रम रिकामा असल्याबाबत सन्मा.सदस्यांची खात्री करुन देण्यात आली तदनंतर सदर १६ चिठ्ठया सारख्या आकाराच्या व एकाच रंगाच्या (पांढरा रंग) तयार करण्यात येवुन त्याला सारख्या कलरचे रबर बॅण्ड लावुन प्लॅस्टीकच्या ड्रममध्ये टाकण्यांत आल्या. ड्रम गोलाकार फिरवून सर्व चिठ्ठया सरमिसळ करण्यात आलीत. ड्रम नंतर उघडणेंत आला व सभागृहाच्या मान्यतेने ड्रममध्ये असणाऱ्या १६ चिठ्ठयांपैकी प्रत्येकी एक या प्रमाणे आठ चिठ्ठया बाहेर काढणेत आले. (मनपा शाळेतील लहान मुलांच्या हातुन प्रत्येकी एक चिठ्ठी बंद ड्रममधून बाहेर काढली) मुलांनी ड्रममधून काढलेली प्रत्येक चिठ्ठी जस-जशी काढली त्याप्रमाणे लगेचच नगरसचिव यांचेकडेस नाव जाहीर करणेकामी सुपूर्द केली. काढण्यात आलेल्या चिठ्ठयावरील सन्मा.सदस्यांची नांवे मा.सभापती व नगरसचिव यांनी वाचून दाखविलीत ती पुढीलप्रमाणे,

| | |
|---|---|
| १ पाटील प्रतिभा सुधिर | २ सोनवणे सुरेश माणिक |
| ३ बेंडाळे उज्वला मोहन | ४ लढ्ढा नितिन बालमुकूंद |
| ५ मराठे जितेंद्र भगवानराव | ६ कापसे मयुर चंद्रकांत |
| ७ बरडे नितीन मनोहर | ८ बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीनुसार चिठ्ठयांमध्ये नांव निघालेले उपरोक्त आठ सदस्य दिनांक १/१०/२०१९ रोजी दुपारी स्थायी समिती सदस्य म्हणून निवृत्त होतील, असे सभापती यांनी घोषीत केले व निघालेल्या आठ चिठ्ठयांवर मा.सभापती यांनी स्वाक्षरी केली.

तदनंतर ड्रममध्ये असलेली व बाहेर काढण्यात न आलेल्या चिठ्ठया बाहेर काढून त्या चिठ्ठया असलेली नांवे नगरसचिव यांनी वाचून दाखविलीत. ती खालीलप्रमाणे,

| | |
|---|---|
| १ बालाणी भगतराम रावलमल | २ ढेकळे सदाशिव गणपतराव |
| ३ पोकळे दिलीप बबनराव | ४ कोल्हे प्रविण रामदास |
| ५ खडके सुनिल वामनराव | ६ सनकत चेतन गणेश |
| ७ भंगाळे विष्णू रामदास | ८ हाडा शुचिता अतुलसिंह |

**सभापती :-** वरील सदस्य पुढील वर्षासाठी स्थायी समितीत कायम राहतील, असे सभापती यांनी घोषीत केले.

**सभापती :-** स्थायी समिती मधील आठ सदस्य दि.०१/१०/२०१९ रोजी निवृत्त होत आहेत. सदर सदस्यांनी एक वर्षाच्या कार्यकाळात स्थायी समितीचे कामकाज करतांना सभागृहात मला मनापासून पूर्ण सहकार्य केले. खेळी मेळीच्या वातावरणात आपण सर्वांनी सभागृहात कामकाज केले. आपल्या सर्वांचे मला वेळोवेळी प्रसंगी मार्गदर्शन ही मिळाले त्यामुळे मी सर्वांचे आभार मानतो.

**श्री.**सुनिल खडके :- मा.सभापती महोदय, आपण वर्षभर ज्या पध्दतीने कामकाज सांभाळले त्यामध्ये मनपा चे लिफ्ट, तसेच ड्रेनेज पाईप लाईनचा प्रश्न तसेच इतर प्रश्न आपण अतिशय चांगल्या प्रकारे आपल्या कार्यकाळ पार पाडला व सभागृहाचे कामकाज अत्यंत चांगल्याप्रकारे शांतपणे व खेळीमेळीमध्ये सभेचे कामकाज चालवले त्याबद्दल मी या सभागृहाचे वतीने आपले आभार व हार्दीक अभिनंदन करतो.

**सभापती :-** नगरसचिव, सभा संपलेली असल्यामुळे राष्ट्रगीत सुरु करावे.

**उपरनिर्दिष्ट प्रक्रियेस अनुसरुन ठराव क्रमांक १६८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक २०१८ संपन्न झालेनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(१) व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार दि.११/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या महासभेने स्थायी समितीत एकूण १६ सदस्यांची नेमणूक करुन स्थायी समितीचे गठन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) नुसार विदयमान स्थायी समितीतून दि.१/१०/२०१९ रोजी आठ सदस्य निवृत्त होत आहे.

स्थायी समितीतील एकूण १६ सदस्यांपैकी आठ सदस्य निवृत्त करावयाचे असल्याने सर्व १६ सदस्यांची नावे असलेल्या स्वतंत्र चिठ्ठया तयार करुन व त्या एकत्रित करुन त्या एका पारदर्शक ड्रम मध्ये टाकून चिठ्ठया मिसळणेत येवुन त्यामधून एक-एक करुन आठ चिठ्ठया बाहेर काढण्यात याव्यात. ड्रम मधून बाहेर काढलेल्या चिठ्ठीवर ज्या सदस्याचे नांव असले तो सदस्य निवृत्त होईल. असा सभागृहाने एकमताने निर्णय घेतला.

उपरोक्त प्रमाणे सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार स्थायी समितीतील सर्व १६ सदस्यांची नांवे असलेल्या चिठ्ठया एका रिकाम्या पारदर्शक ड्रम मध्ये टाकणेत आल्यानंतर डब्यातील सर्व चिठ्ठया मिसळून ड्रम हाताने फिरवुन एक-एक करुन चिठ्ठया बाहेर काढण्यात आल्या. त्यामध्ये

| | |
|---|---|
| १ पाटील प्रतिभा सुधिर | २ सोनवणे सुरेश माणिक |
| ३ बेंडाळे उज्वला मोहन | ४ लढ्ढा नितिन बालमुकूंद |
| ५ मराठे जितेंद्र भगवानराव | ६ कापसे मयुर चंद्रकांत |
| ७ बरडे नितीन मनोहर | ८ बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

उपरोक्त सदस्यांची नांवे निघालेली असल्याने हे सदस्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतूदीनूसार दि.१/१०/२०१९ पासून निवृत्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. कलम ३१ अ (१) व (२) तसेच कलम २० (५) चे तरतूदीनूसार नवीन ८ सदस्य स्थायी समितीवर नामनिर्देशित करणे कामी महासभेकडेस शिफारस करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह

अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव

येणेप्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज होवून सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**